## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे – १७

ड प्रभाग समिती,
कार्यपत्रिका क्र. १०
सभावृत्तांत

दिनांक ७/१/२०१५ दुपारी ३.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची माहे जानेवारी २०१५ ची मासिक सभा बुधवार दिनांक ०७/०१/२०१५ रोजी दुपारी ३.०० वा. ड क्षेत्रिय कार्यालयाच्या छत्रपती शाहू महाराज सभागृह येथे आयोजीत करण्यात आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्रीमती आरती सुरेश चोंधे | अध्यक्षा |
| २. | मा.श्री. आसवानी हिरानंद उर्फ डब्बु किंमतराम | सदस्य |
| ३. | मा.श्रीमती सुनिता राजेश वाघेरे | सदस्या |
| ४. | मा. श्रीमती उषा संजोग वाघेरे (पाटील) | सदस्या |
| ५. | मा. श्री. ताम्हणकर प्रमोद रघुनाथ | सदस्य |
| ६. | मा.श्रीम. काळे विमल रमेश | सदस्या |
| ७. | मा. श्रीमती पाडाळे निता विलास | सदस्या |
| ८. | मा.श्री. विनोद जयवंत नढे | सदस्य |
| ९. | मा.श्रीमती तापकीर अनिता मच्छिंद्र | सदस्या |
| १०. | मा. श्री.कैलासभाऊ गबाजी थोपटे | सदस्य |
| ११. | मा.श्री. नांदगुडे विलास एकनाथ | सदस्य |
| १२. | मा. श्री. बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे | सदस्य |
| १३. | मा. श्रीमती शितल विठ्ठल उर्फ नाना काटे | सदस्या |
| १४. | मा.श्री. रामदास गेणभाऊ बोकड | सदस्य |
| १५. | मा. श्रीमती जवळकर वैशाली राहुल | सदस्या |
| १६. | मा. श्रीमती धराडे शकुंतला भाऊसाहेब | सदस्या |
| १७. | मा. श्री. जगताप राजेंद्र गणपत | सदस्य |

----------

याशिवाय मा. चंद्रकांत खोसे, क्षेत्रिय अधिकारी, मा. मनोज लोणकर, प्रशासन अधिकारी तथा सचिव, मा. रामदास तांबे, कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा, मा. गुलाब दांगट, कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा. एस.एस. चव्हाण, कार्यकारी अभियंता विद्युत, मा. नितीन देशमुख, उपअभियंता विद्युत, मा.विनय ओहोळ, मा. दिलीप सोनवणे, मा. रत्नपारखी,उपअभियंता स्थापत्य,मा. रविंद्र पवार, उपअभियंता जलनि:सारण, मा. दिक्षित, मा. अजय जाधव, मुख्य आरोग्य निरीक्षक, मा. दिक्षित, कनिष्ठ अभियंता, पाणीपुरवठा विभाग, मा. पाडवी, कनिष्ठ अभियंता, विद्युत विभाग इ. अधिकारी उपस्थित होते.

सर्वप्रथम मा. अध्यक्षा यांनी बैठकीस सुरुवात करणेबाबत सूचना दिल्या.

सचिव – ड प्रभाग समिती कार्यपत्रिका क्र. १० वरील विषयांवर खालीलप्रमाणे मंजुरी देणेत आली.

ठराव क्र.२९ विषय क्र. १
दिनांक ०७/०१/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक – मा. विमल रमेश काळे अनुमोदक– मा. प्रमोद ताम्हणकर
संदर्भ – मा. विमल रमेश काळे यांचा दिनांक १०/१२/२०१४ रोजीचा प्रस्ताव

काळेवाडी प्रभाग क्र. ४६ विजयनगर मधील साई इनक्लेव्ह सोसायटी समोरील वाहतुक बेट व सुरुवातीचे दुभाजक यामुळे सोसायटीतील लोकांना व रहदारीला अडथळा होत आहे व छोटे मोठे अपघात होत आहेत. तरी सदर अडथळा ठरणारे वाहतुक बेट व दुभाजक काढणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------------

ठराव क्र.३० विषय क्र. २
दिनांक ०७/०१/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक – मा.हिरानंद उर्फ डब्बु आसवानी अनुमोदक– मा. सुनिता वाघेरे
संदर्भ – मा. हिरानंद उर्फ डब्बु आसवानी यांचा दिनांक १२/१२/२०१४ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ४४ मध्ये अशोक थिएटर येथील गेलॉर्ड चौक येथे मनपाची मुतारी आहे. सदर मुतारीच्या परिसरात साई चौक व गुरद्वारा जवळ मुता-या असलेमुळे गेलॉर्ड चौक येथील मुतारीचा वापर कमी आहे. सदर मुतारी काढणेबाबत या परिसरातील नागरीकांची मागणी आहे. तरी गेलॉर्ड चौक येथील मुतारी काढणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

-------------------

यानंतर मा. अध्यक्षा यांचे मान्यतेने खालीलप्रमाणे ऐनवेळचे विषय दाखल करण्यात आले.

१) प्रभाग क्र. ४८ (तापकीरनगर-श्रीनगर) सर्व्हे नं. ५९ मधील साई प्रितम नगरी इमारतीशेजारी १२ मी. रोड समोरील चौकास "छत्रपती चौक" असे नामकरण करणे

२) प्रभाग क्र. ५६ वैदूवस्ती येथील कल्पतरु फेज १ व फेज २ मधील जो ४० फुटी रस्ता ४५ मीटर रस्त्याला दक्षिणेकडून जोडला जातो व पुढे तसाच तो उत्तरेला काशिद पार्क व महाराष्ट्र कॉलनी जवळकर नगर कडे ४० फुट रस्ता जातो त्या चौकाला "छत्रपती शिवाजी महाराज चौक" नाव देणे व सर्व्हे नं. ८४/१ मधील विजय फ्लोअर मिल (शिंदे गिरणी) समोरील २० फुटी रस्ता जो पश्चिमेस ४५ मीटर रस्त्याला जोडला जातो व पुर्वेस (४० फुटी) सध्या साधारण २० ते ३० फुटी रस्ता असेल त्यास जोडला जाणारा रस्ता आहे त्यास "ऋतुराज कॉलनी जवळकर नगर पिंपळे गुरव" असे नामकरण देण्याची मागणी नागरीकांची व रहिवाशांची असल्याने नामकरण करणे

३) प्रभाग क्र. ४४ मधील अय्यप्पा मंदिरापासुन दुर्गामाता मंदिराकडे जाणा-या रस्त्यास "ओबाळे धर्मशाळा मार्ग" असे नामकरण करणे

४) प्रभाग क्र. ४४ मध्ये गेलॉर्ड चौकाजवळ अय्यप्पा मंदिराजवळ मनपाचे संडास ब्लॉक आहेत. सदर ठिकाणच्या संडास ब्लॉकमुळे स्थानिक नागरीकांना दुर्गंधीचा त्रास येत असलेने सदर संडास पाडणेची मागणी नागरीक करत आहेत. तसेच संडास ब्लॉकमुळे मंदिराचा परिसर दुषित होत आहे. तरी सदर संडास ब्लॉक पाडणे

५) प्रभाग क्र. ४४ अशोक थिएटर येथील शास्त्री गार्डन पासुन साई सागर स्टील कडे जाणा-या रस्त्यास ॲड. टी.व्ही. मुलचंदानी मार्ग “असे नामकरण करणे

६) प्रभाग क्र. ४८ तापकीरनगर, श्रीनगर मधील स.नं. ७२ ते ७३ मधील तापकीर चौक ते तापकीर मळा तसेच आझाद चौक ते पिंपरी गाव पुलापर्यंतचे नॉन डीपी २०५ अंतर्गत रस्ते रद्द करणेत यावेत

७) पिंपरी वाघेरे येथे पवनेश्वर मंदिर येथे मनपाचे टॉयलेट ब्लॉक असुन सद्यस्थितीत सदरच्या टॉयलेट ब्लॉकचा वापर कमी होत असुन या ठिकाणी इतर अवैध कामे सुरु आहेत. यामुळे सदरचे टॉयलेट ब्लॉक पाडणेत यावेत तसेच प्रभाग क्र. ४५ मध्ये नवमहाराष्ट्र शाळेजवळ फुटपाथवर व १०० फुटी रोडवरील फुटपाथवर मनपाची मुतारी आहे. सदर मुतारीचा वापर कमी असुन त्यामुळे नागरीकांना यांचा त्रास होत आहे. तरी सदर संडास ब्लॉक व मुतारी पाडणे.

८) प्रभाग क्र. ४५ मध्ये सौदागर पुलाजवळ मनपाने पत्राशेड वजा विरंगुळा केंद्र उभे केलेले आहे. सदरचे विरंगुळा केंद्र हे खराब झाले असुन मोडकळीस आलेले आहे. तरी सदर विरंगुळा केंद्र पाडून नवीन आर.सी.सी. विरंगुळा केंद्र उभे करणे

९) प्रभाग क्र. ४६ विजयनगर येथील इंगळे हॉस्पिटल मागील रस्त्यास कै. पै. सिताराम बाळोबा नढे असे नामकरण करणे

मा. अध्यक्षा यांचे मान्यतेने ऐनवेळेस दाखल करुन घेणेत आलेल्या विषयांवर मंजूरी देणेत आली.

ठराव क्र. ३१ — विषय क्र. ३

दिनांक ०७/०१/२०१५ — विभाग – स्थापत्य

सुचक – मा.कैलास गबाजी थोपटे — अनुमोदक– मा. अनिता मच्छिंद्र तापकीर

संदर्भ – मा. कैलास गबाजी थोपटे यांचा दिनांक ०७/०१/२०१५ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ४८ (तापकीरनगर-श्रीनगर) सर्व्हे नं. ५९ मधील साई प्रितम नगरी इमारतीशेजारी १२ मी. रोड समोरील चौकास “छत्रपती चौक” असे नामकरण करणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

-------------------

ठराव क्र. ३२ — विषय क्र. ४

दिनांक ०७/०१/२०१५ — विभाग – स्थापत्य

सुचक – मा. वैशाली राहूल जवळकर — अनुमोदक– मा. अनिता मच्छिंद्र तापकीर

संदर्भ – मा. वैशाली राहूल जवळकर यांचा दिनांक ०७/०१/२०१५ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ५६ वैदूवस्ती येथील कल्पतरु फेज १ व फेज २ मधील जो ४० फुटी रस्ता ४५ मीटर रस्त्याला दक्षिणेकडून जोडला जातो व पुढे तसाच तो उत्तरेला काशिद पार्क व महाराष्ट्र कॉलनी जवळकर नगर कडे ४० फुट रस्ता जातो त्या होणा-या चौकाला “छत्रपती शिवाजी महाराज चौक” नाव देणे व सर्व्हे नं. ८४/१ मधील विजय फ्लोअर मिल (शिंदे गिरणी) समोरील २० फुटी रस्ता जो पश्चिमेस ४५ मीटर रस्त्याला जोडला जातो व पुर्वेस (४० फुटी) सध्या साधारण २० ते ३० फुटी रस्ता असेल त्यास जोडला जाणारा रस्ता आहे त्यास “ऋतुराज कॉलनी जवळकर नगर पिंपळे गुरव” असे नामकरण देण्याची मागणी नागरीकांची व रहिवाशांची असल्याने सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

-------------------

ठराव क्र. ३३ — विषय क्र. ५

दिनांक ०७/०१/२०१५ — विभाग – स्थापत्य

सुचक – मा.हिरानंद उर्फ डब्बू आसवानी — अनुमोदक– मा. निता विलास पाडाळे

संदर्भ – मा. वैशाली राहूल जवळकर यांचा दिनांक ०७/०१/२०१५ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ४४ मधील अय्यप्पा मंदिरापासुन दुर्गामाता मंदिराकडे जाणा-या रस्त्यास "ओबाळे धर्मशाळा मार्ग" असे नामकरणाबाबत नागरीकांकडून मागणी होत आहे. सबब अय्यप्पा मंदिरापासुन दुर्गामाता मंदिराकडे जाणा-या रस्त्यास "ओबाळे धर्मशाळा मार्ग" असे नामकरण करणेच्याप्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

---------------------

ठराव क्र. ३४ विषय क्र. ६

दिनांक ०७/०१/२०१५ विभाग – स्थापत्य

सुचक – मा.हिरानंद उर्फ डब्बू आसवानी अनुमोदक– मा. निता विलास पाडाळे

संदर्भ – मा. हिरानंद उर्फ डब्बू आसवानी यांचा दिनांक ०७/०१/२०१५ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ४४ मध्ये गेलॉर्ड चौकाजवळ अय्यप्पा मंदिराजवळ मनपाचे संडास ब्लॉक आहेत. सदर ठिकाणच्या संडास ब्लॉकमुळे स्थानिक नागरीकांना दुर्गंधीचा त्रास येत असलेने सदर संडास पाडणेची मागणी नागरीक करत आहेत. तसेच संडास ब्लॉकमुळे मंदिराचा परिसर दुषित होत आहे. तरी सदर संडास ब्लॉक पाडणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

---------------

ठराव क्र.३५ विषय क्र. ७

दिनांक ०७/०१/२०१५ विभाग – स्थापत्य

सुचक – मा.हिरानंद उर्फ डब्बू आसवानी अनुमोदक– मा. निता विलास पाडाळे

संदर्भ – मा. हिरानंद उर्फ डब्बू आसवानी यांचा दिनांक ०७/०१/२०१५ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ४४ अशोक थिएटर येथील शास्त्री गार्डन पासुन साई सागर स्टील कडे जाणा-या रस्त्यास "ॲड. टी.व्ही. मुलचंदानी मार्ग "असे नामकरण करणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

---------------

ठराव क्र. ३६ विषय क्र. ८

दिनांक ०७/०१/२०१५ विभाग – स्थापत्य

सुचक – मा. अनिता मच्छिंद्र तापकीर अनुमोदक– मा. वैशाली जवळकर

संदर्भ – मा. अनिता मच्छिंद्र तापकीर यांचा दिनांक ०७/०१/२०१५ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ४८ तापकीरनगर, श्रीनगर मधील स.नं. ७२ ते ७३ मधील तापकीर चौक ते तापकीर मळा तसेच आझाद चौक ते पिंपरी गाव पुलापर्यंतचे नॉन डीपी २०५ अंतर्गत रस्ते रद्द करणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

---------------

ठराव क्र. ३७ विषय क्र. ९

दिनांक ०७/०१/२०१५ विभाग – स्थापत्य

सुचक – मा. श्रीमती उषा संजोग वाघेरे (पाटील) अनुमोदक– मा. मा. श्रीमती शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

संदर्भ – मा. श्रीमती उषा संजोग वाघेरे (पाटील) यांचा दिनांक ०७/०१/२०१५ रोजीचा प्रस्ताव

पिंपरी वाघेरे येथे पवनेश्वर मंदिर येथे मनपाचे टॉयलेट ब्लॉक असुन सद्यस्थितीत सदरच्या टॉयलेट ब्लॉकचा वापर कमी होत असुन या ठिकाणी इतर अवैध कामे सुरु आहेत. यामुळे सदरचे टॉयलेट ब्लॉक पाडणेत यावेत तसेच प्रभाग क्र. ४५ मध्ये नवमहाराष्ट्र शाळेजवळ फुटपाथवर व १०० फुटी रोडवरील फुटपाथवर मनपाची मुतारी आहे. सदर मुतारीचा वापर कमी असुन त्यामुळे नागरीकांना यांचा त्रास होत आहे. तरी सदर संडास ब्लॉक व मुतारी पाडणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

---------------

ठराव क्र. ३८ — विषय क्र. १०

दिनांक ०७/०१/२०१५ — विभाग – स्थापत्य

सुचक – मा. श्रीमती उषा संजोग वाघेरे (पाटील) — अनुमोदक– मा. मा. श्रीमती शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

संदर्भ – मा. श्रीमती उषा संजोग वाघेरे (पाटील) यांचा दिनांक ०७/०१/२०१५ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ४५ मध्ये सौदागर पुलाजवळ मनपाने पत्राशेड वजा विरंगुळा केंद्र उभे केलेले आहे. सदरचे विरंगुळा केंद्र हे खराब झाले असुन मोडकळीस आलेले आहे. तरी सदर विरंगुळा केंद्र पाडून नवीन आर.सी.सी. विरंगुळा केंद्र उभे करणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

---------------

ठराव क्र. ३९ — विषय क्र. ११

दिनांक ०७/०१/२०१५ — विभाग – स्थापत्य

सुचक – मा. प्रमोद रघुनाथ ताम्हणकर — अनुमोदक– मा. विमल रमेश काळे

संदर्भ – मा. प्रमोद रघुनाथ ताम्हणकर यांचा दिनांक ०७/०१/२०१५ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ४६ विजयनगर येथील इंगळे हॉस्पिटल मागील रस्त्यास “कै. पै. सिताराम बाळोबा नढे पथ” असे नामकरण करणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

---------------

बैठकीचे कामकाज चालू असताना खालील प्रमाणे सन्मा. नगरसदस्यांनी त्यांचे म्हणणे मांडले.

मा. रामदास बोकड – प्रभाग समितीमध्ये मान्य झालेल्या ठरावावर किती कालावधीमध्ये अंमलबजावणी करणे आवश्यक आहे याची माहिती प्रभाग अधिकारी यांनी द्यावी.

प्रभाग अधिकारी – प्रभाग समितीमध्ये मान्य झालेल्या प्रस्तावावर जर निविदा विषयक काम असल्यास त्या कामाचे अंदाजपत्रक तयार करुन काम करण्यास कालावधी लागेल. अन्यथा फलक लावणे, नामकरण करणे इ. साठी विशेष कालावधीची आवश्यकता नाही.

सचिव तथा प्रशासन अधिकारी – ठराव सभेत पारीत झाल्यानंतर तो पुढील सभेत कायम करण्यात येतो व त्यानंतर त्या ठरावावर कार्यवाही करणेसाठी संबंधित विभागाकडे पाठविण्यात येतात व त्यांचेकडून कार्यवाही झाल्यानंतर अहवाल प्राप्त करण्यात येतो.

मा.दांगट – फलक बसविण्याची कार्यवाही पुढील महिन्यात होईल.

मा. राजेंद्र जगताप – मागील सभेत झालेल्या निर्णयावर कार्यवाही काय झाली त्याची माहिती द्यावी व त्यानंतर सभेचे पुढील कामकाज सरु करावे.

मा. अध्यक्षा – पाणी पुरवठयाबाबत अद्यापही सुधारणा नाही

मा. रामदास तांबे – पाणी पुरवठयाबाबत अडचणी निराकरण करण्याचा प्रयत्न करतो व माहिती देतो.

मा. रामदास बोकड – नागरी सुविधा केंद्राचे कामकाज असमाधानकारक आहे. तेथील कर्मचारी यांचे नागरीकांशी बोलणे योग्य पध्दतीचे नाही. नागरीक सन्मा. नगररसदस्य यांचेकडे तक्रारी करतात.

मा. शितल विठ्ठल उर्फ नाना काटे – रहाटणी शाळेतील प्राथमिक विद्यालयाचे ठिकाणी मुलींच्या टॉयलेटजवळ पत्र्याचे शेड करावे.

मा. दांगट – सदर विषयावर ठराव करणे उचित होईल .

यानंतर मा. अध्यक्षा यांनी बैठक संपलेचे जाहीर केले.

सही/-
(आरती सुरेश चोंधे)
**सभापती**
ड प्रभाग समिती पिं.चिं.म.न.पा.,
रहाटणी ४११०१७

सही/-
**प्रशासन अधिकारी तथा**
**सचिव, सभाशाखा**
ड क्षेत्रिय कार्यालय,पिं.चिं.म.न.पा.,
रहाटणी, पुणे-१७

क्रमांक – ड/१३/कावि/ ११ /२०१५
दिनांक – ११ /०२/२०१५